**ठळक बातम्या**

- चालू आर्थिक वर्षात राज्याचा आर्थिक विकास दर ८ टक्क्यांच्या जवळ राहण्याची शक्यता, वित्तीय तूट ३ टक्क्यांपेक्षा कमी

- दरडोई उत्पन्नात गेल्यावर्षीच्या तुलनेत ३० हजारांची वाढ, महाराष्ट्र देशात पाचव्या स्थानी

- राज्यसभा निवडणुकीसाठी राज्यातून शरद पवार, पार्थ पवार, विनोद तावडे, रामदास आठवले, ज्योती वाघमारे यांच्यासह ९ उमेदवारांचे अर्ज

- वाहतूकदारांचा राज्यव्यापी संप मागे

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेतल्या उपांत्य फेरीतल्या सामन्यात भारताविरुद्ध नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा इंग्लंडचा निर्णय

**आणि**

- येत्या २ दिवसात कोकणात उष्णतेच्या लाटेचा इशारा

**<><><><><>**

चालू आर्थिक वर्षात राज्याच्या आर्थिक विकास दरात ७ पूर्णांक ९ दशांश टक्के वाढ अपेक्षित आहे. सेवा क्षेत्रात सर्वाधिक ९ टक्के, उद्योग क्षेत्रात ५ पूर्णांक ७ दशांश टक्के आणि कृषी आणि संलग्न क्षेत्रात ३ पूर्णांक ४ दशांश टक्के राहील असा अंदाज राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालात मांडण्यात आला आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट**

*चालू आर्थिक वर्षात राज्याचं एकूण उत्पन्न ५१ लाख ५९७ कोटी राहण्याची अपेक्षा आहे. राज्याचं दरडोई उत्पन्न सुमारे ३ लाख ४८ हजार रुपये असल्याचं अहवालात म्हटलं आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत यात ३० हजार रुपयांची वाढ झाली आहे. राष्ट्रीय पातळीवर २ लाख ५ हजार ३२४ रुपये दरडोई उत्पन्न आहे. दरडोई उत्पन्नात तेलंगणा, कर्नाटक, तमिळनाडू, गुजरात नंतर महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. जिल्ह्यांचा विचार करता मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, रायगड हे जिल्हे दरडोई उत्पन्नात आघाडीवर असून हिंगोली, बुलढाणा, वाशिम, गडचिरोली, नंदूरबार हे शेवटच्या ५ स्थानी आहेत.*

*देशाच्या सांकेतिक स्थूल देशांतर्गत उत्पन्नात महाराष्ट्राचा वाटा १४ टक्के असून तो देशातील सर्वाधिक आहे. देशाच्या एकूण निर्यातीत राज्याचा हिस्सा १५ टक्के आहे.*

*या आर्थिक वर्षात राज्याची आर्थिक महसुली जमा ५ लाख ६० हजार ९६४ कोटी तर महसुली खर्च ६ लाख ६ हजार ८५५ कोटी राहील असा अंदाज अहवालात वर्तवण्यात आला आहे. राजकोषीय तूट २०२४-२५ या आर्थिक वर्षात, २ पूर्णांक ७ दशांश टक्के तसेच महसुली तूट ९ दशांश टक्के राहण्याचा अंदाज आहे. त्यापूर्वीच्या आर्थिक वर्षात ही तूट २ पूर्णांक २ दशांश टक्के होती. बिहारमध्ये वित्तीय तूट ९ टक्क्यांच्यावर आहे तर आंध्र प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, मध्यप्रदेश, पश्चिम बंगालमध्ये हे प्रमाण ४ टक्क्यांच्या वर आहे.*

*राज्याच्या कर्जात ११ पूर्णांक १ दशांश टक्के म्हणजे सुमारे ९३ हजार कोटींची वाढ अपेक्षित असून चालू आर्थिक वर्षात राज्यावर ९ लाख ३२ हजार २४२ कोटींचा कर्जभार आहे. त्यावर राज्य सरकार ६४ हजार ६५९ कोटी रुपये व्याज देणार आहे.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी विधानभवनातून कौस्तुभ पटाईत*

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस उद्या दुपारी २ वाजता राज्याचा अर्थ संकल्प सादर करतील.

<><><><>

खासगी शैक्षणिक संस्थांमधले प्रवेश आणि शुल्क नियमन करणारं महाराष्ट्र विना अनुदानित खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था सुधारणा विधेयक आज विधानसभेत आवाजी मतदानाने मंजूर झालं. यात शिक्षण शुल्क नियामक प्राधिकरण, अपील, सीईटी कक्ष यासंदर्भात विविध तरतुदी आहेत. अधिनियमातल्या तरतुदींचं उल्लंघन करणाऱ्या शिक्षण संस्थांना दंड आकारण्याचीही तरतूद यात आहे.

<><><><>

राज्यात प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत गेल्या वर्षी जवळपास चार लाख घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्यात आल्याची माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. अमोल मिटकरी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या उत्तरात त्यांनी ही माहिती दिली. गेल्या वर्षी राज्यातल्या २८ लाख २४ हजार ३८६ घरांना मान्यता देण्यात आली होती. त्यापैकी ३ लाख ९५ हजार २२२ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून हा एक विक्रम असल्याचंही त्यांनी सांगितलं.

<><><><>

राज्य मंत्रिमंडळानं आज धर्मांतर विरोधी कायद्याच्या मसुद्याला मंजुरी दिल्याची माहिती मंत्री नितेश राणे यांनी बातमीदारांशी बोलताना दिली. धर्म स्वतंत्र अधिनियम २०२६ या नावानं हा कायदा केला जाणार आहे. या अंतर्गत अजामीन पात्र गुन्हे दाखल होणार असल्यानं लव्ह जिहादसारखी प्रकरणं घडणार नाहीत असं ते म्हणाले.

<><><><><>

कामावर येणाऱ्या एसटीच्या प्रत्येक चालकाची आणि वाहकाची मद्यपान तपासणी बंधनकारक करण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. मुंबईतल्या परळ इथल्या बसस्थानक भेटी दरम्यान त्यांना काही कर्मचारी मद्यधुंद अवस्थेत असल्याचे आढळले होतं. याप्रकरणाची सखोल चौकशी झाली असून केली असून समितीच्या शिफारसी सर्व एसटी आगारामध्ये लागू करण्याचे निर्देश दिल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

राज्यसभेच्या निवडणुकीसाठी राज्यातल्या सात जागांसाठी आज ज्येष्ठ नेते शरद पवार, रामदास आठवले, विनोद तावडे, पार्थ पवार यांच्यासह ९ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. दोन अपक्षांचे अर्ज सूचक नसल्याने बाद होण्याची शक्यता असल्यानं ही निवडणूक बिनविरोध होईल, असा अंदाज आहे. अधिक जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून

होल्ड व्हाइस कास्ट

*भारतीय जनता पक्षाकडून रामदास आठवले, विनोद तावडे, रामराव वडकुते आणि माया इवनाते यांनी आज अर्ज भरला. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीन, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यावेळी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेच्या ज्योती वाघमारे यांनी अर्ज भरला. राष्ट्रवादी काँग्रेसकडून पार्थ पवार यांनी अर्ज दाखल केला. तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार उपस्थित होत्या. महाविकास आघाडीने शरद पवार यांना पाठिंबा दिला आहे. प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते अर्ज भरण्यासाठी विधानभवनात येऊ शकले नाहीत. उमेदवार आजारपणामुळे येऊ शकत नसेल तर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या शपथेवर अर्ज दाखल करण्याची तरतूद आहे. त्यानुसार जे जे रुग्णालयाच्या अधीक्षकांनी*

*शपथ दिली. कांते सायाना, उमेश मेहत्रे यांनी अपक्ष अर्ज दाखल केले. मात्र सूचक म्हणून १० आमदारांची स्वाक्षरी नसल्याने हे अर्ज छाननी मध्ये बाद होण्याची शक्यता आहे. या अर्जांची छाननी उद्या होणार आहे.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी विधानभवनातून कौस्तुभ पटाईत*

**<><><><><>**

कोल्हापुरातल्या श्रीक्षेत्र ज्योतिबा मंदिर आणि परिसराच्या सुधारित विकास आराखड्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवन इथं शिखर समितीची बैठक झाली. मंदिराच्या या नव्या विकास आराखड्याअंतर्गत १७० कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. तर जुन्या राखड्याअंतर्गत ८० कोटी रुपये खर्चाची कामे प्रत्यक्षात सुरु झाली आहेत. अमरावतीममधल्या हनुमान गढी परिसराचा पर्यटनाच्या दृष्टीकोनातून विकास करण्यासाठीच्या प्रस्तावालाही या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली. या प्रकल्पासाठी १२१ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. हा परिसर उत्कृष्ट धार्मिक पर्यटन केंद्र म्हणून विकसित करावा असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. नागपूरमधल्या कल्याणेश्वर मंदिर परिसराच्या विकास कामाचा आढावाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी घेतला. मोठ्या प्रमाणात वाहने उभी करता येईल अशी पद्धतीनं वाहनतळाचा विकास करण्याची सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

इ-चलान रद्द करण्याबाबत शासन सकारात्मक भूमिका घेणार असल्याचं आश्वासन सरकारनं दिल्यावर वाहतूकदारांनी राज्यव्यापी संप आज मागे घेतला. रात्रीपासून हा संप सुरू झाला होता. वाहतूकदारांच्या विविध समस्यांवर तोडगा काढण्यासाठी

लवकरच पोलीस आणि परिवहन विभागाची संयुक्त बैठक बोलावण्यात येणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

<><><><>

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बारामतीजवळ घडलेल्या विमान अपघाताच्या चौकशी दरम्यान या अपघातग्रस्त विमानाच्या व्हीएसआर (VSR) विमान कंपनीचे मालक व्ही. के. सिंग यांची आज पुण्यातल्या सीआयडी कार्यालयात चौकशी करण्यात आली.

<><><><>

सरोगसीच्या जाळ्यासाठी स्त्रीबीजांची अनधिकृत रित्या काढल्याप्रकरणी नाशिक पोलिसांनी एका आयव्हीएफ केंद्रावर कारवाई केली असून हे केंद्र सील करण्यात आलं आहे. या रॅकेटच्या माध्यमातून अनधिकृतरित्या स्त्रीबीज काढून ते ठाणे जिल्ह्यातल्या बदलापूर इथं पाठवली जात होती. या संदर्भातली काही आक्षेपार्ह कागदपत्रं बदलापूर इथं आढळल्यानंतर नाशिकच्या या केंद्रावर कारवाई करण्यात आली.

<><><><>

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्व चषक स्पर्धेतला दुसरा उपांत्य सामना मुंबईतल्या वानखेडे मैदानावर सुरू आहे. भारताविरुद्धच्या या सामन्यात इंग्लंडनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या 2-- षटकात --१ बाद २०धावा झाल्या होत्या. उपांत्य फेरीतल्या पहिल्या सामन्यात न्यूझीलंडनं काल दक्षिण आफ्रिकेवर ९ गडी राखून विजय मिळवला आणि अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. अंतिम सामना रविवारी अमदाबादमध्ये रात्री ७ वाजता सुरू होणार आहे.

<><><><>

येत्या दोन दिवसात कोकणात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

रणरणत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यातल्या सर्व शाळा सकाळच्या सत्रात भरवण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिले आहेत.

**//<><><><><>//**